# वसई विरार शहर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

**- सुधारित अर्थसंकल्प २०१४-२०१५ सह २०१५-२०१६ मुळ अर्थसंकल्पाबाबत टिपणी -**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९७ नुसार परिवहन उपक्रमाचा आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांनी परिवहन उपक्रमाचा सन २०१४-१५ च्या सुधारीत अर्थसकंल्पासह सन २०१५-१६ चा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी उत्पन्न व खर्चाच्या सादर केलेल्या अंदाजातबाबत मा. परिवहन समितीने चर्चा व विचार विमर्ष करुन याच अधिनियमाचे कलम ९८ (३) नुसार २०१४-१५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ चे अंदाज पत्रक "ब" तयार करुन मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यास शिफारस केली आहे.

**प्रारंभिक शिलकेसह उत्पन्न व खर्च पुढीलप्रमाणे आहे.**

(₹ लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | परिवहन व्यवस्थापक ह्यांनी शिफारस केलेले अंदाज | |
|---|---|---|---|
| | | सुधारित अर्थसंकल्प सन २०१४-२०१५ | मुळ अंदाज सन २०१५-१६ |
| १ | जमा रकमा | ₹ १००९.८३ | ₹ १४९०७.६९ |
| २ | खर्च रकमा | ₹ १००८.८२ | ₹ १४९०६.६८ |

**अर्थसंकल्पिय ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत.**

**जमा बाब :-**

१. **जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजना परिवहन सेवा अनुदान :-** केंद्र शासनाच्या JnNURM योजनेमधून परिवहन सेवेसाठी सुधारित मंजूर ₹ १९३ कोटी २२ लक्ष रकमेपैच्या प्रस्तावामधील ₹ १४४ कोटी २५ लक्ष अनुदानापैकी सन २०१५-१६ मध्ये एकूण ₹ ५८ कोटी ४८ लक्ष ४० हजार रक्कम प्राप्त होणार आहे. त्यामध्ये बसेससाठी ₹ ४६ कोटी ९२ लक्ष, डेपो बांधकामासाठी ₹ ४ कोटी ८४ लक्ष ४० हजार व संगणकिय प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी ₹ ६ कोटी ७२ लक्ष इतक्या रकमेचा समावेश आहे.

२. **परिवहन उपक्रमासाठी अर्थसहाय्य :-** परिवहन उपक्रमासाठी प्राप्त झालेल्या अनुदान रकमेमध्ये महानगरपालिकेच्या हिश्याची रक्कम समाविष्ट करणेकरिता वित्तिय संस्थेकडून ₹ ५० कोटी अर्थसहाय्य अपेक्षित आहे.

३. **बीओटी तत्वावरील परिवहन रॉयल्टी उत्पन्न :-** वसई विरार शहर महानगरपालिकेची परिवहन सेवा BOOM पध्दतीने रॉयल्टी बेसीसवर सुरु आहे. परिवहन सेवेमध्ये सध्या ११९ बसेस चालु आहेत. प्रति बस वार्षिक ₹ १ हजार प्रमाणे रॉयल्टी रक्कम मंजूर करण्यात आलेली असून ११९ बसेससाठी ₹ १ लक्ष १९ हजार रॉयल्टी प्राप्त होत आहे. केंद्र शासनाकडून JnNURM योजनेमधून प्राप्त झालेल्या अनुदान रकमेमधून २२० बसेस खरेदी करण्यात येणार आहेत. सदरच्या बसेस अभिकर्त्यास चालविण्यासाठी देण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रति बस ₹ २० हजार प्रत्येक महिन्यास रॉयल्टी स्वरुपात प्राप्त होणे अपेक्षित आहे. ह्याप्रमाणे २२० बसेससाठी ₹ ५ कोटी २८ लक्ष वर्षाला रॉयल्टी स्वरुपात प्राप्त होणे अपेक्षित आहे. असे एकूण ₹ ५ कोटी २९ लक्ष १९ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

४. **विना तिकिट प्रवास सवलतीसह महानगरपालिकेच्या विविध योजनांवरिल सुट/सवलतीसाठी अंशदान :-** सदरकामी महानगरपालिकेकडून आगामी वर्षासाठी ₹ १० कोटी रक्कम अपेक्षित आहे. तसेच वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेच्या जमा व खर्चामधिल तुट भरुन काढण्यासाठी महानगरपालिकेकडून आगामी वर्षासाठी ₹ २५ कोटी २३ लक्ष ८४ हजार अंशदान रक्कम अपेक्षित आहे.

**खर्च बाब :-**

१. **नविन बस खरेदी व बसविषयी भांडवली खर्च** :- परिवहन उपक्रमामार्फत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजने अंतर्गत सुधारीत मंजुर प्रस्तावातील ३४६ बसेस पैकी प्राथमिक टप्प्यात २२० बसेस खरेदीसाठी आगामी वित्तिय वर्षामध्ये ₹ ७७ कोटी ४८ लक्ष ४० हजार खर्च अपेक्षित आहे.

२. **बस डेपो बांधकाम** :- परिवहन उपक्रमासाठी दोन ठिकाणी बस डेपो बांधणेत येणार आहेत. त्याकरिता आगामी वित्तिय वर्षात ₹ २८ कोटी खर्च अपेक्षित आहे.

३. **परिवहन संगणक उपक्रम खरेदी** :- परिवहन उपक्रमामधिल संगणकीय प्रणाली विकसित करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडुन ₹ १० कोटी ५७ लक्ष अनुदान रक्कम प्राप्त होणार आहे. सदर रकमेमध्ये महानगरपालिका हिश्याची रक्कम रु.४ कोटी ५३ लक्ष समाविष्ट करुन एकुण रक्कम ₹ १५ कोटी १० लक्ष रकमेपैकी सन २०१५-१६ वर्षामध्ये ₹ ७ कोटी ५५ लक्ष इतकी रक्कम खर्च होणे अपेक्षित आहे.

४. **महानगरपालिकेकडुन शालेय विद्यार्थी, अंध-अंपग व जेष्ठ नागरिक ह्यांना बस प्रवासापोटी देण्यात येणाऱ्या सवलतीची खर्च प्रतिपुर्ती** :- महानगरपालिकेकडुन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या शालेय विद्यार्थी ह्यांना ६६.६६%, ज्येष्ठ नागरिकांना ५०%, अंध व अपंग व्यक्तिंना सोबत्यासह प्रवास प्रवास भाड्यामध्ये ५०% सुट इत्यादी कामी आवश्यक तरतुदी आहेत. मा. महासभेने धोरण ठरविल्यास सदरच्या देण्यात येणाऱ्या सवलतीकरिता होणाऱ्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी ₹ १० कोटी रक्कम प्रस्तावित आहे.

५. **परिवहन उपक्रम घसारा निधी** :- परिवहन उपक्रमामार्फत नविन बसेस खरेदीसाठी व बस डेपो बांधण्यासाठी होणारा एकुण खर्च रकमेवर १०% रक्कम घसारा निधी म्हणुन ₹ ९ कोटी ४७ लक्ष २२ हजार प्रस्तावित आहे.

६. सन २०१५-२०१६ मध्ये परिवहन उपक्रमाकरीता संगणक फॅक्स मशिन, स्कॅनर खरेदीसाठी ₹ ५ लक्ष, फर्निचर, वॉटर कुलर खरेदीसाठी ₹ ५ लक्ष, वातानुकुलित यंत्रणा खरेदीसाठी ₹ २ लक्ष, कर्जाच्या मुद्दल परतफेडीसाठी ₹ २ कोटी २८ लक्ष, इतर अनुषंगीक भांडवली खर्चासाठी ₹ ७ कोटी २२ लक्ष तसेच कर्मचारी वेतन व भत्यासाठी ₹ १५ लक्ष, भाडे तत्वावरील वाहन भाडे व प्रवास भत्यासाठी ₹ २६ लक्ष, सभापती व सदस्यांना फि साठी ₹ १५ लक्ष, कर्जावरील व्याज परतफेडीसाठी ₹ ३ कोटी ४२ लक्ष, अनुषंगीक महसुली खर्चासाठी ₹ २ कोटी ५८ लक्ष, कार्यालय दुरुस्ती /नुतनिकरणासाठी ₹ १८ लक्ष, संगणक, फॅक्स मशिन, स्कॅनर इ. दुरुस्तीसाठी ₹ ५० हजार, फर्निचर, वॉटर कुलर दुरुस्तीसाठी ₹ ५० हजार, वातानुकुलित यंत्रणा दुरुस्तीसाठी ₹ ५० हजार, विद्युत देयकांसाठी ₹ १ लक्ष, दुरध्वनी देयकांसाठी ₹ १ लक्ष,झेरॉक्स खर्चासाठी ₹ ५५ हजार, प्रसिध्दी खर्चासाठी ₹ ११ लक्ष तरतुद रक्कम आहे.

धन्यवाद !

दिनांक :- १२/०२/२०१५

सही/-
(गोविंद राठोड)
आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक
वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन उपक्रम

# वसई विरार शहर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

**-: सन २०१४-१५ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ च्या मुळ अर्थसंकल्पाबाबत सभापती परिवहन समिती यांचे मनोगत :-**

मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर सो! पालघर लोकसभा मतदार संघाचे प्रथम खासदार मा. श्री. बळीरामजी जाधव सो! मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर सो! मा. आमदार श्री. विलासजी तरे सो! यांच्या विशेष प्रयत्नामुळे वसई - विरार शहर महानगरपालिकेने ११९ बसेसद्वारे शहरात परिवहन सेवेची यशस्वी सुरुवात केली असुन वस्ती तेथे बससेवा या संकल्प पुर्तीची मुहुर्तमेढ रोवली आहे. या उपक्रमास नागरीकांचा लाभत असलेला उत्तम प्रतिसाद विचारात घेऊन त्यांनी जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजनेत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचा समावेश करुन घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. याद्वारे ₹ १९३ कोटी २२ लक्ष इतक्या रकमेचा प्रकल्प मंजुर करुन घेतला असुन सुधारीत प्रस्तावामधील ३४६ बसेस पैकी २२० बसेस महानगरपालिकेच्या ताफ्यात आगामी वित्तीय वर्षात दाखल होणार आहेत. बस खरेदीसह ३ बसडेपो व इतर अनुषंगीक खर्चासाठी या योजनेअंतर्गत ₹ १४४ कोटी २५ लक्ष अनुदान मंजुर झाले असुन प्रथम टप्प्यात ₹ ५८ कोटी ४८ लक्ष ४० हजार अनुदान प्राप्त होणार आहे.

अन्य महानगरपालिकांच्या परिवहन सेवा तुटीत असताना आपले नेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर सो! यांच्या सकारात्मक अभ्यासू भुमीकेतून कार्यान्वीत झालेल्या वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेद्वारे ₹ ५ कोटी २९ लक्ष १९ हजार इतके रॉयल्टी स्वरुपातील उत्पन्न अपेक्षित आहे, आणि म्हणूनच शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे बसेस देखभाल दुरुस्ती व प्रवास भाडे वसुली यासाठी स्वतंत्र अभिकर्ता नेमून कार्यवाही न करता सद्यस्थितीत सुरु असलेल्या पद्धतीनेच परिवहन सेवा सुरु ठेवण्याचा महानगरपालिकेचा निर्णय असुन आपली यशस्वी उल्लेखनीय परिवहन सेवा भविष्यात इतरांसाठी पथदर्शी ठरत असल्याचे जाणकारांचे अभिप्राय आहेत.

महानगरपालिकेकडुन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या शालेय विद्यार्थी ह्यांना ६६.६६%, ज्येष्ठ नागरिकांना ५०%, अंध व अपंग व्यक्तिंना ५०% प्रवास भाड्यामध्ये सुट देण्यात येत आहे. भविष्यात महानगरपालिकेच्या प्रस्तावित संभाव्य धोरणानुसार समाजातील विविध घटकांची मते जाणून घेऊन विना तिकीट प्रवास सेवा अंमलात आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. संपुर्ण शहरात आवश्यक त्या सर्व मार्गीकांवर परिवहन सेवा सुरु होणार असुन ऐतिहासीक, सांस्कृतीक वारसा लाभलेल्या आपल्या या महानगराचे दर्शन घडवणारी पर्यटकांचे आकर्षण ठरुन स्थानिकांना उत्पन्नाचे साधन निर्माण करुन देणारी वसई दर्शन बससेवा व लांब पल्ल्याच्या मार्गीका

लवकरच सुरु करुन परिवहन सेवेस बळकटी प्राप्त करणेसाठी प्रयत्न करण्याचा प्रस्ताव आहे.

परिवहन उपक्रम यशस्वी करणेसाठी सर्वांचे बहुमोल सहकार्य यापुढेदेखील वेळोवेळी लाभेल याची खात्री असुन वरीलप्रमाणे मा. परिवहन समितीने ठराव क्र. २ दि. ०३/०२/२०१४ अन्वये शिफारस केलेला अर्थसंकल्प मा. स्थायी समिती सभेपुढे सहर्ष सादर करणेस शिफारस आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने वेळोवेळी आपल्याला सहकार्य केले आहे, त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. मा. परिवहन समितीने मंजुर केलेला हा परिवहन उपक्रमाचा प्रथम अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असुन ही संधी मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर सो! मा. आमदार श्री. विलासजी तरे सो!, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर सो! मा. प्रथम महापौर सो! मा. प्रथम उपमहापौर साहेब, मा. महापौर सो! मा. उपमहापौर सो! सर्व पदाधिकारी, माझे मा. परिवहन समितीतील सर्व सहकारी, मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा. सदस्य व कार्यकर्ते यांनी दिली व मा. परिवहन समितीतील सर्व सदस्यांनी मला वेळोवेळी जे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

धन्यवाद !

जय हिंद जय महाराष्ट्र !

आपला,

(भरत गुप्ता)

सभापती

परिवहन समिती

वसई - विरार शहर महानगरपालिका